# इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मे. टाटा स्टील लिमिटेड, सी.आर.सी.वेस्ट, प्लॉट नं.एस-७६, एम.आय.डी.सी. तारापूर, तारापूर औद्योगिक क्षेत्र, पोस्ट - बोईसर, तालुका-पालघर, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र (४०१ ५०६) यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित उत्पादन क्षमता विस्तार अंतर्गत कोल्ड रोल्ड कॉईल्स एन्ड शीट्स (२,१०,०००.० टन प्रतिवर्ष वरुन ३,००,०००.० टन प्रतिवर्ष), हॉट रोल्ड पिकल्ड स्किन पास कॉईल्स (९०,०००.० टन प्रतिवर्ष ते १,५०,०००.० प्रतिवर्ष) साठी विद्यमान सुविधांचा विस्तार, तसेच नवीन सुविधा हॉट रोल्ड पिकल्ड गॅल्वनाईज्ड कॉईल्स (८,२०,०००.० टन प्रतिवर्ष) भर घालण्याच्या अनुषंगाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. टाटा स्टील लिमिटेड, सी.आर.सी.वेस्ट, प्लॉट नं.एस-७६, एम.आय.डी.सी. तारापूर, तारापूर औद्योगिक क्षेत्र, पोस्ट - बोईसर, तालुका-पालघर, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र (४०१ ५०६) यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित उत्पादन क्षमता विस्तार अंतर्गत कोल्ड रोल्ड कॉईल्स एन्ड शीट्स (२,१०,०००.० टन प्रतिवर्ष वरुन ३,००,०००.० टन प्रतिवर्ष), हॉट रोल्ड पिकल्ड स्किन पास कॉईल्स (९०,०००.० टन प्रतिवर्ष ते १,५०,०००.० प्रतिवर्ष) साठी विद्यमान सुविधांचा विस्तार, तसेच नवीन सुविधा हॉट रोल्ड पिकल्ड गॅल्वनाईज्ड कॉईल्स (८,२०,०००.० टन प्रतिवर्ष) भर घालण्याच्या अनुषंगाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थान मे. टाटा स्टील लिमिटेड, सी.आर.सी.वेस्ट, प्लॉट नं.एस-७६, एम.आय.डी.सी. तारापूर, तारापूर औद्योगिक क्षेत्र, पोस्ट - बोईसर, तालुका-पालघर, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र (४०१५०६) येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, यांनी श्री बाळासाहेब कोळेकर, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे.टाटा स्टील लिमिटेड, सी.आर.सी.वेस्ट, प्लॉट नं.एस-७६, एम.आय.डी.सी. तारापूर, तारापूर औद्योगिक क्षेत्र, पोस्ट - बोईसर, तालुका-पालघर, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र (४०१ ५०६) यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित उत्पादन क्षमता विस्तार अंतर्गत कोल्ड रोल्ड कॉईल्स एन्ड शीट्स (२,१०,०००.० टन प्रतिवर्ष वरुन ३,००,०००.० टन प्रतिवर्ष), हॉट रोल्ड पिकल्ड स्किन पास कॉईल्स (९०,०००.० टन प्रतिवर्ष ते १,५०,०००.० प्रतिवर्ष) साठी विद्यमान सुविधांचा विस्तार, तसेच नवीन सुविधा हॉट रोल्ड पिकल्ड गॅल्वनाईज्ड कॉईल्स (८,२०,०००.० टन प्रतिवर्ष) भर घालण्याच्या अनुषंगाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब सेक्टर ३ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA - State Environment Impact Assessment Authority), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील तज्ञ समिती यांचेकडून प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यात आलेला आहे.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार , दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता घेणेकरीता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-९८/२०२२ ,व्दारा

पत्र क्रं. बीओ/ जेडी/ डब्लुपीसी/ पीएच/ बी-२२१२०९ एफटीएस-०२४३, दिनांक ०९/१२/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, पालघर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे | - **सदस्य** |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर दिनांक ०१-१२-२०२२ रोजीच्या स्थानिक “दैनिक वृत्तपत्र लोकमत “ यात मराठीत व “टाइम्स ऑफ इंडिया” यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी, पालघर, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, ता. जि. पालघर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर
३. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,
५. तहसीलदार, तहसील कार्यालय-पालघर, जिल्हा- पालघर
६. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय-कोलवडे, तालुका व जिल्हा-पालघर
७. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ -ठाणे
८. उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, जिल्हा-पालघर
९. संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई

उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर यांना जन सुनावणी दिवशी एक सूचना प्राप्त झालेली आहे.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय विभाग, मुंबई यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

प्रकल्पाचे अधिकारी यांनी टाटा समुह व प्रकल्पाने केलेली विविध सामाजिक कामांविषयी माहिती दिली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास एकूण खर्च अंदाजे रुपये १,११९.० कोटी येणार असून अतिरिक्त ३५० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळू शकतो. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसाय व रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की, प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत त्या मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/स्पष्टीकरण/आश्वासनेः -**

१) **श्री मनिष संखे, राहणार - कोलवडे गाव, तालुका व जिल्हा-पालघरः-**

मी पर्यावरण दक्षता मंच समितीचा अध्यक्ष आहे आणि महात्मा गांधी तंटामुक्ती समिती कोलवडेचा अध्यक्ष आहे. गावातील उपस्थिती कमी आहे, कारण टाटा नांव ऐकले हे वेगळी प्रेरणा तयार होते. या समुहाबद्दल आम्हांला आदर आहे. आता टाटा समुहाचे जे अध्यक्ष आहेत, त्यांच्याविषयी आदर आहे, ते देशाचे एक प्रेरणा स्थान आहे. ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे, त्यामुळे गावाच्या वतीने काही सूचना करणार आहे.

जरी सादरीकरणात विस्तृत मांडणी होती, तरी काही पर्यावरण घटकांविषयी शंका विचारावीशी वाटते. आदर वेगळा व गावाविषयीची निष्ठा ही वेगळी असते.

आपण प्रकल्पात १५,००० झाडे लावल्याचे प्रतिपादन केलेले आहे.

तारापूर हे घोषित औद्योगिक क्षेत्र आहे. गेल्या वर्षी राष्ट्रीय हरित लवादाने तारापूरला देशात सर्वात मोठे औद्योगिक प्रदूषित क्षेत्र संबोधित केलेले आहे. त्याअनुषंगाने आपण बघतो काय स्थिती आहे.

मूळात झेडएलडी प्रकल्प आहे. पण तारापूर औद्योगिक क्षेत्रात जे कारखाने झेडएलडी तत्वावर चालतात. त्यांनी या झेडएलडी तत्वाला गालबोट लावलेले आहे. झेडएलडी ही कल्पना नावालाच असते व रासायनिक पाण्याचा निचरा केला जातो. तरी आम्हांला व गावाच्या सरपंचांना प्रकल्पातील झेडएलडी विषयी विस्तृत माहिती द्यावी.

१५,००० वृक्षांची लागवड आपण म्हणालात. मात्र उद्योग समुह चालवताना ब-याच अडचणी असतात, मुळात जागेची अडचण असते. तरी कंपनीच्या आवारात एवढी जागाच नसते की तेथे १५,००० झाडे लावण्यात येतील. आपण हरित पट्टा आपल्या कुरगाव येथील निवासी क्षेत्रात विकसित केलेला आहे. पण नुसते लॉन लावून पर्यावरण संरक्षण होत नाही. तर स्थानिक झाडांचे (local species) वृक्षारोपण केल्यास पर्यावरण संरक्षण होऊ शकते.

सादरीकरणाप्रमाणे तयार करण्यात आलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा चुकीचा आहे. अहवालात असे सांगितले आहे की, माती परिक्षण, जल परिक्षण केल्यानंतर भूजलाची पात्रता चांगली आहे असे प्रतिपादन केलेले आहे. ते पूर्ण चुकीचे आहे. परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोत हे अत्यंत प्रदूषित झालेले आहेत. आमच्या विहिरी रासायनिक सांडपाण्याने भरलेल्या आहेत. येथील नैसर्गिक नाले हे तुडुंब रासायनिक सांडपाण्याने वाहत आहेत. त्यामुळे परिसरातील मातीचे, पाण्याचे नमुने हे चुकीचे

असावेत, ते कदाचित टाटा स्टीलच्या अवारातील असतील किंवा नसतील. पण मातीचे, पाण्याचे नमुनेचा निष्कर्ष अत्यंत चुकीचा आहे.

आपण अहवालात नमुद केलेले आहे की, आमच्या येथील जमिनी ह्या शेतीयोग्य आहेत. ते पुर्णपणे चुकीचे आहे. आमच्या ज्या उरल्यासुरल्या जमिनी आहेत, त्या नापीक झालेल्या आहेत. येथे पारंपारिक शेती मुळीच शक्य नाही. तरी जमिनीचा दर्जा व पडीक जमिन आहेत,

मुळात कारखानदारांजवळ जागा नसते. मी वारंवार सूचना केलेली आहे की, आमच्या ज्या जागा आहेत, गावाच्या ज्या पडिक जमिनी आहेत, तेथील शेतक-यांना विश्वासात घेऊन जर तेथे स्थानिक वृक्षांची लागवड शक्यतो फळझाडांची लागवड केली किंवा शेतक-यांच्या समुहाला एकत्रित केले व शेतीतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शेती व्यवसायास जर प्रोत्साहित केले, तर निश्चितच पर्यावरण संरक्षण/सुधार होऊ शकेल.

दुसरा विषय आपली वाहतूक व्यवस्था. आपली वाहतूक व्यवस्था (transportation) खूपच मोठे असते. येथे शेकडो गाड्या लावलेल्या असतात. येथे अपघात होऊन स्थानिकांचे मृत्यु झालेले आहेत. तरी शासकीय नियमांप्रमाणे वाहतुक व्यवस्थापन योजना अंमलात आणावी, जेणेकरुन अपघाताची संख्या कमी करता येईल. सम-विषम तारखांप्रमाणे पार्किंग करणे आवश्यक आहे. कंपनी शेजारच्या शेतक-यांच्या पडीक जमिनी जर शेतक-यांना विश्वासात घेऊन आपण भाड्याने घेतल्या, तर त्यांच्या रोजगाराचा प्रश्न सुटेल व सुरक्षिततेचा प्रश्न सुटेल.

प्रकल्प विस्तारीकरणामुळे चार पट वाढणार आहे. विस्तारिकरण प्रकल्पास शुभेच्छा. मात्र त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पात नवीन ३५० व्यक्तींना नोक-या, म्हणजे एकूण ८०० व्यक्तींना प्रत्यक्ष प्रकल्पात रोजगारची संधि, तर विस्तारिकरणामुळे परिसरात अप्रत्यक्ष २,००० लोकांना रोजगार मिळणार. त्याचप्रमाणे परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात वाढ होईल.

येथे १००% कोलवडे महसूल क्षेत्रात आपले कारखाने आहेत. त्यामुळे १००% कोलवडे गावातील लोकांचे योगदान आपल्या कारखान्यास आहे. आमच्या पुर्वजांनी नाममात्र भावाने जमिन उद्योगांसाठी उपलब्ध करुन दिल्या. मात्र खेदाने सांगावे लागते की टाटा स्टीलमध्ये मागच्या पिढीत नोक-या होत्या, या पिढीत नोक-या नाहीत. मात्र येथे जे पोट-व्यवसाय निर्माण होतात, त्यात आम्हांला, स्थानिकांना प्राधान्य दिले जात नाही. याबाबत सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे.

येथे TMRCT हॉस्पिटल सुरु होते. एमआयडीसीने एक रुपया भाडेतत्वावर सामाजिक तत्वावर भूखंड दिलेले होते. काही कारणांमुळे ते बंद होते. ते टाटा स्टीलने परत चालू केले. १००% ज्या गावच्या भूखंडावर आपले कारखाने आहेत, त्यांना या हॉस्पिटलचा फायदा होत नाही. हे TMRCT हॉस्पिटल व्यावसायिक दृष्टीकोनातून चालवितात. त्यामुळे इकडचे लोक त्या हॉस्पिटलला जाण्याचे टाळतात. कोलवडे गावाला जर प्रकल्पग्रस्त म्हणून नमुद करण्यात आले, तर कोलवडे गावातील रहिवाशांना जर काही मोबदला मिळाला, तर पुढे जाण्यास हरकत नाही.

खेदाने सांगावे लागते की, आपण शून्य आरोग्य शिबिरे भरविली आहेत. तरी जर आरोग्य शिबिरे आयोजित करणार असतील, तर कोलवडे गावाला प्राधान्य देण्यात यावे.

कोटी रुपयांचा सीएसआर असूनही ज्या गावात प्रकल्प कार्यरत आहे, त्या गावाचा विचार केला जात नाही. गावाची जी स्मशानभूमि आहे, त्याला चौफेर कुंपण, सुशोभीकरण करण्याचे आश्वासन अजूनही पाळण्यात आलेले नाही.

तारापूर विद्या मंदिराचा भूखंड एमआयडीसीने एक रुपया मात्र भाडेतत्वावर दिलेला आहे. जी शैक्षणिक संस्था, क्रिडा संकूल आहे, त्याठिकाणी कोलवडे गावाला काही सबसिडी दिली, तर या गावाचे जे उपकार आहेत, त्यांना कृतज्ञता व्यक्त करता येईल.

आपण प्लॅस्टीकला पर्याय दिलेला असून कापडी व कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण चालविता. जर महिला बचत गटाला यामुळे जर रोजगार प्राप्त झाला, तर निश्चतच त्यांचा फायदा होईल.

जैव-वैविधता (bio-diversity) बाबत सांगायचे म्हणजे येथील मोरी खाडी हा मुख्य नाला आहे. तो घातक सांडपाण्याने तुडुंब भरुन वाहत आहे. त्याला जोडून तीन पोट-नाले आहेत. ते मोरी खाडीला मिळतात आणि पुढे ती सर्व खाडीला मिळतात. खाडी समुद्राला मिळते. तेथील दशा ही वाईट आहे. तेथे ज्या खार-फुटीच्या (Mangroves) जाती, प्रजाती होत्या, त्या संपुष्टात आलेल्या आहेत. त्या खारफुटीतील मुसळ वगैरे अनेक खार-फुटीच्या (Mangroves) जाती नष्ट झालेल्या आहेत. तेथे जे स्थानिक वृक्ष होते, ते नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे पुनर्वसन कसे होईल याबाबत टाटा समुहाने जर योगदान दिले, तर नैसर्गिक संवर्धन होईल. काही तज्ञांच्या मदतीने मी २-३ वर्षांपूर्वी तेथील सर्वेक्षण केलेले आहे. आपण wet land ला waste land समजतो. हे चुकीचे आहे. Bio-Diversity व Wet Land चे महत्व सर्वांनाच माहित आहे. तर आपल्याला सीएसआर निधीतून Bio-diversity Park उभारता आले तर निश्चितच कोलवडे गाव त्याबाबत भूखंडाचे योगदान देईल.

घन कचरा विल्हेवाट हा आपल्या समुहाचा अंतर्गत भाग असेल. प्रकल्प स्थानाच्या काही मीटर अंतरावर डपिंग ग्राऊंड आहे त्याची अतिशय दुरावस्था आहे. गेले १५ वर्षे आम्ही भांडत आहोत. एमआयडीसीने आम्हांला भूखंड द्यावा व आम्ही शास्त्रीय पध्दतीने घन कच-याची विल्हेवाट लावावी, त्यासाठी आम्ही डीपीआर दिले, मात्र त्यावर अजूनही काही मार्ग निघालेला नाही. तर टाटा समुहाने आपला सीएसआर निधी वापरुन कोलवडे अंतर्गत/गावासाठी छोटासा कचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प देता आला, तर तो आपण निश्चित द्यावा.

औद्योगिक सुरक्षा संदर्भात विवेचन केले.परिसरात कारखान्यातील अपघात मालिका झाली की थांबत नाही. भिती, दडपणाखाली हे गाव राहत आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी येथील स्थानिकांना स्वतःच्या जमिनी दिल्या, शासनाला/देशाला महसुल मिळतो, या औद्योगिक क्षेत्रामुळे देशभरातील लोकांचे भले झाले. मात्र हे गाव सदोदित भितीच्या छायेखाली आहे. टाटा समुह औद्योगिक सुरक्षेबाबत चांगले काम करत आहे, मात्र टाटा समुहाने जर स्थानिक तरुण-तरुणींना प्रशिक्षण देऊन Rescue Squad उभारले, तर पोलिस दलाचाही भार कमी होईल. तरी प्रशिक्षणाची गरज लक्षात घ्यावी.

Rain Water Harvesting बाबत आपण सांगितले की, पावसाचे पाणी आपण संकलित करता व येथेच मुरविता. ही स्वागतार्ह बाब आहे. पण इतरांना त्याबाबत सेवा, मार्गदर्शन दिले, तर निश्चितच रेन वॉटर हार्व्हेस्टिंग प्रकल्प हा परिसरात राबविता येईल.

आपण पर्यावरण व्यवस्थापन योजना व सीईआर बाबत माहिती सांगितली. सुमारे १.८० कोटी रुपये सीईआरसाठी खर्च करण्याचे आश्वासन दिलेले आहे. तर सीईआर संदर्भात विकास आराखडा तयार करताना काही तज्ञांना घेतले तर निश्चितच याचा फायदा होईल, जर हा जैववैविधतेसाठी खर्च झाल्यास निश्चतच पर्यावरण पुनर्भरणासाठी त्याचा उपयोग होईल. ईएमपी (Environment Management Plan) व सीईआर (Corporate Environment Responsibility) खर्च करताना स्थानिकांना बोलविल्यास येथील नैसर्गिक संसाधनांची आम्हांला पूर्ण माहिती आहे - उदा. पूर्वी तळे कुठे होते, नैसर्गिक जलस्त्रोत कुठे आहे, उतार कुठे होता, कुठल्या स्थानिक वनस्पती आहेत याची आम्हांला माहिती आहे. टाटा समुहाबरोबर आमचाही हातभार या योगदानासाठी लागेल.

टाटा हे देशाचे प्रेरणास्थान आहे. टाटा समुह हा एवढा मोठा प्रकल्प आमच्या गावात उभारत आहे, त्यासाठी आवश्यक असणा-या मनुष्यबळासाठी जर स्थानिकांना विश्वासात घेतले, तर टाटा समूहास आमचेंही कायमस्वरुपी योगदान राहिल. आमचा प्रकल्पास विरोध नाही, विकासाला विरोध नाही. पण शाश्वत विकासासाठी आम्ही कायम बरोबर असू.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री मनिष संखे यांनी उपस्थित केलेल्य सूचनांनुसार झेडएलडी प्रकल्पाविषयी स्पष्टीकरण द्यावे, त्याचप्रमाणे वृक्षारोपण कुठे व कसे करणार व त्यांनी सूचना केल्यानुसार एकत्रित येऊन गावातील पडीक जमिनीवर हरितपट्टा विकसित करण्याचे प्रकल्पाचे काही नियोजन आहे का, याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना माहिती दिली की, आमचा झेडएलडी प्रकल्प आहे, तो ख-या अर्थाने झेडएलडी प्रकल्प आहे. त्यांनी प्रकल्प प्रत्यक्ष येऊन बघण्याचे आवाहन केले. प्रकल्पातून पाण्याचा एक थेंबही प्रकल्पाबाहेर सोडण्यात येत नाही. प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित असून ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या सर्व्हरला जोडलेली आहे. प्रत्येक गोष्टींची ऑनलाईन नोंद घेण्यात येंत असते.

त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्पात रिव्हर्स ऑस्मोसिस -Riverse Osmosis (RO) प्रकल्प कार्यान्वित आहे. ईटीपीतील पाणी आर.ओ. ला जाते. आरओमध्ये प्रक्रिया होते. सर्वात जास्त रिकव्हरी देणारा प्रकल्प एमआयडीसी तारापूरमध्ये आहे याबाबत आम्हांला अभिमान आहे. ८७% आम्ही पाण्याची रिकव्हरी करतो. बाकीचे वेस्ट बाष्पीभवन केले जाते. पाण्यातून जे वेस्ट- क्षार, घन टाकाऊ पदार्थ निघतात, ते मुंबई वेस्ट मॅनेजमेंटला पाठविले जाते. त्यामुळे आपण आश्वास्त रहा की, हा प्रकल्प झेडएलडी प्रकल्प असून आपण कोणतीही शंका बाळगू नये. त्याबाबत आम्ही दर्शनी भागात माहिती (Display) दिलेली आहे. आपणास त्याबाबत जास्त माहिती हवी असल्यास ती उपलब्ध करण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे सांगितले की मनिष संखे यांनी विस्तृत मुद्दे उपस्थित केले. त्यातील ज्याच्याशी रोजचा संबंध येतो, त्या मुद्द्यांची उत्तरे देण्यात येत आहेत.

श्री मनिष संखे यांनी वाहतुकीबाबत मुद्दा उपस्थित केलेला होता. तर सद्यस्थितीचा व भविष्यातील गोष्टींचा विचार करुन आम्ही एक जागा भाड्याने घेतलेली आहे. तेथे वाहतुक तळ विकसित करण्यात येत आहे. गाड्यांची वाहतुक ही सुनियोजित पध्दतीने करण्यात येईल. गेले १५-२० दिवस जर आपण पाहिले असेल तर लक्षात येईल की, कंपनीच्या गेटवर/रस्त्यावर जास्त ट्रक्स दिसले नसतील. त्याला आम्ही पुढे विस्तारित करणार आहोत. तरी वाहतुक व्यवस्थेवर विचारपूर्वक पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे सांगितले की, श्री मनिष संखे यांनी गावातील पडीक जमिनीवर हरित पट्टा विकसित करण्याची मागणी केली. त्यांनी उत्तर देताना सांगितले

की मियावाकी पध्दतीने झाडांचे वृक्षारोपण होते. त्यात स्थानिक झाडांना प्राधान्य देण्यात येते. आम्ही त्याची माहिती घेतली व एक छोटासा भाग (patch) या कारखान्यात विकसित केलेला आहे. उर्वरित ११,००० झाडांबाबत अंमलबजावणी करण्यात येईल. पडीक जमिनीबाबत निश्चितच वृक्षारोपणासाठी विचार करण्यात येईल.

यावेळी श्री मनिष संखे यांनी मियावाकी बाबत आक्षेप नोंदविताना सांगितले की, जेथे भूखंड कमी असतो, त्याठिकाणी विविध जाती, प्रजातीची झाडे चिकटून लावण्यात येतात. मात्र त्यांचे आयुष्य फार कमी असते. त्यांनी पुढे सांगितले की, जर एवढा पैसा खर्च करणार आहेत, तर आपल्याकडे जमिन नाही, ती आम्ही उपलब्ध करुन देऊ. त्यांनी सांगितले की, ते स्वतः गावात आवाहन करतील की ज्यांची पडिक जमिन आहे, तर बांधाबांधावर वृक्षारोपण करण्यात यावे. मियावाकीचा पर्यावरणास फारसा फायदा होत नाही. कमी जागेत नाही पेक्षा चांगले एवढेच. तरी त्याऐवजी स्थानिक प्रजातीचे वृक्षारोपण करणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य होईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी येथे आश्वासन दिले की, पडीक जागा उपलब्ध करुन दिल्यास त्यावर निश्चित वृक्षारोपण करण्यात येईल व येत्या पावसाळ्यात त्यास सुरवात करता येऊ शकते.

श्री मनिष संखे यांनी मागणी केली की, स्मशानभूमीची आखणी झालेली आहे. तर सुशोभिकरणाच्या दृष्टीने काम प्राधान्याने हाती घ्यावे. प्रकल्प प्रवर्तकांनी त्याबाबत आश्वासन दिले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

२. **<u>श्री नरेन्द्र संखे, राहणार-बोरीगाव,तालुका व जिल्हा-पालघरः-</u>**

ही एमआयडीसी १९७०-८० दशकात सुरु झाली. या एमआयडीसी विषयी प्रेम पाहिले. या एमआयडीसीत बरेच अपघात झाले. मात्र सदरहू कंपनीत गेले ४० वर्षे एकही अपघात झाल्याचे मी वाचले नाही. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सर्व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या सर्वेक्षणाची व सर्व परिक्षणांची माहिती दिली. तर प्रकल्पाच्या अधिका-यांनी प्रकल्पाच्या विस्तारीकरणाची माहिती दिली. श्री मनिष संखे यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्यावर टाटा स्टील लक्ष देईल असा मला विश्वास आहे. टाटा स्टीलने चारी बाजूने अनेक झाडे कंपनीच्या आवारात लावलेली आहेत. जल, हवा, माती, ध्वनी हे प्रदूषित झाले की पर्यावरण प्रदूषित होते. मात्र मी पेपरात असे काही वाचले नाही की, टाटा स्टीलने पर्यावरणाचे हे चार घटक प्रदूषित केले. तसेच हा प्रकल्प परिसरात रोजगारनिर्मिती करणार आहे.

तरी एक नागरिक म्हणून सदरहू प्रकल्प त्वरित सुरु व्हावा अशी माझी इच्छा व्यक्त करतो, प्रकल्पाचे समर्थन करतो. प्रकल्पास त्वरित मंजूरी द्यावी अशी शासनास विनंती करतो.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

३. **श्री संतोष राऊत, पंतप्रधान पुरस्कारर्थी, राहणार-केळवे, तालुका व जिल्हा-पालघरः-**

ही कंपनी गेले २९ वर्षांपासून तारापूर एमआयडीसीत कार्यरत आहे. कंपनीने सुरक्षा आणि पर्यावरणाला महत्व देत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करत असते. बोईसर एमआयडीसीतील अपघाताचे प्रमाण बघून या कंपनीत वेळोवेळी मॉक ड्रील आयोजित केले जाते. त्यावेळेस इतर कंपनीतील प्रतिनिधी, कामगार, एमआयडीसीतील अग्निशामक विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना बोलवून प्रात्यक्षिके दाखविण्यात येतात. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होण्यास नक्कीच मदत होईल. या कंपनीतील काम हे एसओपी मार्फत आणि संपूर्ण सुरक्षासाधने घातल्याशिवाय होत नाही. काम करताना पॉझिटिव्ह एशुरन्सचा वापर करुनच कंपनीचे काम चालते. हा प्रकल्प टाटा स्टीलमध्ये झिरो एक्सिडेंट प्रकल्प मानला जातो. त्याचप्रमाणे पर्यावरणाचाही समतोल राखला जातो. दूषित पाणी, सांडपाणी जमिनीत सोडले जात नाही. अनेकवेळा कंपनीत वृक्षारोपणाचे कार्यक्रम केले जातात. हा प्रकल्प झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणून समजला जातो. नैतिकतेला धरुन सरकारी नियमांचे पालन करुन या कंपनीचे कामकाज केले जाते. महिला कर्मचा-यांना उत्तम अशी वागणूक दिली जाते. त्याचप्रमाणे आजूबाजूच्या शाळेतील आदिवासी मुलींना जमशेदपूरहून ज्योती स्कॉलरशीप दिली जाते. त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगतीसुध्दा चांगली झाली आहे. मी केळवे येथे राहतो. एवढे लांब जवळजवळ २५-५० कि.मी. आमची शाळा आहे. या शाळेतही जी आदिवासी मुलेमुली आहेत, ते या सुविधेचा फायदा घेतात. आपल्या देशाला हॉट रोल्ड पिकल्ड गॅल्वनाईज्ड कॉईल्स परदेशातून आणावे लागते, तर सदरहू प्रकल्पात हॉट रोल्ड पिकल्ड गॅल्वनाईज्ड कॉईल्सचे उत्पादन होणार आहे. त्यामुळे आम्हांला या प्रकल्पाविषयी आनंदच आहे. टाटा स्टीलचे अजून प्रकल्प येथे यावेत, त्यामुळे स्थानिकांना रोजगार, नोकरीधंदा मिळेल, त्यामुळे महाराष्ट्राचा विकास होईल. तरी हा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की, या प्रकल्पात जे मॉक ड्रील अपघाताबाबत केले जाते, त्यात येथील बाधित ग्रामपंचायतीतील

लोकांनाही सहभागी करुन त्यांना प्रशिक्षण दिले तर ते उत्तम राहिल. याची कंपनी प्रशासन दखल घेतील अशी अपेक्षा करतो.

**४. श्री सायमंड रॉड्रिक्स, राहणार-वसई विरार,तालुका,जिल्हा-पालघरः-**

मी वसई -विरारचा रहिवाशी असून टाटा स्टील कंपनीत गेले ३० वर्षे नोकरी करत आहे. एक खास बाब नमुद करावीशी वाटते ती म्हणजे कोरोनामुळे २० मार्च, २०१९ ला लॉकडाऊन झाला. त्यावेळी कंपनीने आमची खूप काळजी घेतली. कारण करोना काळात भीतीचे वातावरण तयार झालेले होते. वसई विरारच्या लोकांना कंपनीने घरी बसून पाच महिन्यांचा पगार दिला व स्थानिक लोकांनी हा प्रकल्प सांभाळला. त्याबद्दल मी स्थानिक लोकांचे व टाटा स्टील व्यवस्थापनाचे आभार मानतो.

**५. श्री दीपक लक्ष्मण पाटील,राहणार-कोलवडे गाव पोलिस पाटील, तालुका,जिल्हा-पालघरः-**

टाटा स्टीलच्या बाजूला माझे गाव आहे. आम्ही याच पुढील रस्त्याने जात असतो. त्यांनी जी सुरक्षा ठेवलेली आहे, ती वाखाणण्यासारखी आहे. श्री मनिष संखे यांनी कोलवडे गावाच्या समस्या मांडल्या आहेत, तरी टाटा स्टीलने कोलवडे गावातील समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. टाटा स्टील व्यवस्थापन त्याबाबात योग्य ती दखल घेतील अशी मी आशा व्यक्त करतो. सद्या येथील ज्वलंत मुद्दा म्हणजे स्मशानभूमीस कंपाऊंड वॉल व सुशोभीकरण केलेले नाही. ते करणे गरजेचे आहे. परप्रांतीय तेथे नासधुस करतात. गावाच्या हितासाठी गावाला योगदान दिले तर गावसुध्दा या कंपनीस सहकार्य करेल. आमचे कोलवडे गाव हे प्रदूषित्त आहे. आम्हांला येथे चार दिवससुध्दा व्यवस्थित राहता येत नाही. आम्हांला आरोग्याची भिती वाटते. जनसुनावणीत ज्या समस्या उपस्थित केल्या, त्या कंपनी व्यवस्थापन सोडवतील अशी मी आशा व्यक्त करतो.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जवळ-जवळ २४ कामगार हे कोलवडे गावाचे आहेत. प्रकल्पात अत्याधुनिक सयंत्रणा, रोबोटिक्स, सर्व संगणकीय प्रणाली आहे. त्यामुळे लागणारे कामगार ह्यांची कमीतकमी शैक्षणिक अहर्ता ही आयटीआय, एनसीव्हीटी असावी. जर शैक्षणिक अहर्ता असल्यास त्याचा विचार करण्यात येतो.

**६. श्री जयंत अटकर, माजी नगरसेवक,वसई विरार,तालुका व जिल्हा-पालघरः-**

ही जनसुनावणी आयोजित केली त्याबद्दल शासनाचे आभार. येथे सर्व उपस्थितांनी टाटा स्टीलबाबत चांगल्या गोष्टी सांगितल्या आहेत. या प्रकल्पामुळे उत्पन्न होणारा प्रत्यक्ष रोजगार व अप्रत्यक्ष रोजगार यांविषयी निर्णय घेऊन हा प्रकल्प लवकारात लवकर चालू होईल अशी आम्ही आशा करतो.

त्यांनी प्रकल्प अधिकारी यांना प्रश्न विचारला की, सीएसआर निधी हा फक्त तालुक्यापुरता मर्यादित ठेवलेला आहे वा जिल्ह्याचा विचार केलेला आहे. याबाबत सविस्तर उत्तर देण्यात यावे.

**श्री दीपक लक्ष्मण पाटील,राहणार-कोलवडे गाव पोलिस पाटील** यांनी आक्षेप नोंदविला की, प्रकल्पात आयटीआय जर घेणार, तर इंजिनियर्स घ्यावे अशी सूचना केली. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, कमीतकमी शैक्षणिक अहर्ता ही आयटीआय असून इंजिनियर्सच्या नियुक्तीसाठी काही कॉलेजेस् ही कंपनीने अधिसूचित केलेली आहेत. सर्व भारत/ देशस्तरावर काही कॉलेजेस ही कंपनीने अधिसूचित केलेली आहेत.

**येथे श्री मनिष संखे यांनी मत मांडले की** ज्यावेळी रोजगार निर्मिती होईल, त्यावेळी स्थानिकांना, संबंधित ग्रामपंचायतीस त्याबाबत सूचना करण्यात यावी. संबंधित अधिका-यांचा मोबाईल उपलब्ध करण्यात यावा. स्थानिक असले तरी शिस्त पाळणे बंधनकारक राहिल.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सद्या प्रकल्पात ८३% स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे. जेव्हा प्रकल्प स्थापित झाला, तेव्हाही महाराष्ट्र शासनाच्या नियमांचे पालन करुनच रोजगार निर्मिती करण्यात आली होती आणि सद्यस्थितीतही महाराष्ट्र शासनाच्या नियमांचे पालन करुनच रोजगार निर्मिती करण्यात येऊन स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आजूबाजूच्या परिसरातील गावे उदा- कुरगाव, नांदगाव, मुरबा, खैरापाडा, बोईसर, या गावातील लोकच आपल्या प्रकल्पात काम करत आहेत.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, हा आनंदाचा दिवस आहे. बैठकीत उपस्थितांनी आपल्या सूचना सांगताना टाटा समुहाविषयी आपला आदर, जिव्हाळा व्यक्त केला. एवढ्या वर्षांची परंपरा असताना आपली तत्वे सांभाळणे अन्य कोणालाही शक्य झालेले नाही. येथे बैठकीत स्थानिकांनी आग्रह केलेला आहे की प्रस्तावित प्रकल्प हा लवकरात लवकर सुरु करण्यात यावा.

अध्यक्ष यांनी मत मांडले की, पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आणि पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी उपस्थितांनी

योग्य प्रकारे आपले मुद्दे मांडले त्याबद्दल अभिनंदन केले. अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानून जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

दि. ११.०१.२०२३ रोजीची प्राप्त झालेले लेखी सूचना सोबत जोडली आहे.

**(प्रशांत गायकवाड)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
तारापूर-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
तारापूर

**(रविंद्र आंधळे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे

**(बाळासाहेब कोळेकर)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर,
जिल्हा-पालघर